| MHKO050021852022 | **म.सं.कौ.हि.का.अर्ज क्र.७०/२०२२ मधील निशाण ७२ खालील आदेश** | **लता अमर शेटे<br>वि.<br>अमर प्रभाकर शेटे** |
|---|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वि.प.क्र.१ यांना पोटगीची रक्कम न भरल्यामुळे पुन्हा तुरूंगात ठेवण्याकरिता दिलेला आहे. अर्जदार यांचे असे कथन आहे की, वि.प.क्र.१ यांना पोटगीची रक्कम न भरल्यामुळे ३० दिवसांकरिता साध्या कैदची शिक्षा ठोठाविण्यात आली होती. त्याप्रमाणे वि.प.क्र.१ हा तुरूंगात आहे. वि.प.क्र.१ यांनी पोटगीची कोणतीही रक्कम भरलेली नाही. त्यामुळे त्यास पुन्हा पोटगीची रक्कम रू. २,१०,५००/– वसुल करण्याकरिता तुरूंगात ठेवण्यात यावे अशी विनंती केली.

२. सदरील अर्जावर वि.प.क्र.३ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. वि.प.क्र.३ यांचे असे कथन आहे की, नि.६५ वरील आदेशाप्रमाणे थकित पोटगी रक्कम रू.२,१०,५००/– करिता तुरूंगात ठेवण्याबाबत अर्ज दाखल केला व नि.७० च्या आदेशाप्रमाणे वि.प.क्र.१ यांना ३० दिवसांची साधी कैद सुनावण्यात आली. वि.प.क्र.३ यांचे असेही कथन आहे की, अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार नाही. वि.प.क्र.३ यांचे पुढे असेही कथन आहे की, फौ.प्र.संहितेच्या कलम १२५ प्रमाणे एक वर्षापेक्षा अधिक रक्कमेकरिता अर्ज करता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नाही. वि.प.क्र.३ यांचे पुढे असेही कथन आहे की, त्यांनी आज रोजी एकूण ३ अर्ज दाखल केलेले आहेत आणि ते अर्ज प्रस्तुत म्हणण्याचा भाग समजण्यात यावेत व सोबत वाचावेत. वि.प.क्र.३ यांचे पुढे असेही कथन आहे की, वि.प.क्र.१ हे पोटगी रक्कम भरत होते. ते प्रस्तुत वि.प.क्र.२ व ३ च्या आजारी व वयोवृध्द आईवडीलांची सेवासुश्रुशा, पालनपोषण करत होते व ते तुरूंगात कैदेत असल्याने त्यांचे पालनपोषण सेवासुश्रुशा करणारे

कोणीही नाही. तसेच वि.प.क्र.१ हे कैदेत असल्याने व त्यांना उत्पन्नाचे साधन नसल्याने पोटगी रक्कम भरण्यास आज रोजी सक्षम नाहीत. शेवटी वि.प.क्र.३ यांनी अशी विनंती केली की, नि.७२ वरील अर्ज नामंजूर करावा.

**३.** अर्जदार व वि.प.क्र.१ते ४ यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे वि.प.क्र.१ यांनी रू.२,१०,५००/– एवढी पोटगीची रक्कम दिलेली नाही. त्याकरिता अर्जदार यांनी नि.६५कडे वि.प.क्र.१ यांना अटक अधिपत्र काढण्याकरिता अर्ज दिला होता. तो अर्ज मंजूर करून रक्कम रू.२,१०,५००/– वसुल करण्याकरिता वि.प.क्र.१ यांना अटक अधिपत्र जारी केले. त्यानंतर वि.प.क्र.१ यांना दि.१३/०३/२०२५ रोजी वडगांव पोलिस यांनी अटक करून न्यायालयासमक्ष हजर केले. त्याप्रमाणे वि.प.क्र.१ यांना त्यांनी पोटगीची रक्कम न दिल्यामुळे ३० दिवसांकरिता साधी कारावासाची शिक्षा देण्यात आली. तसेच वि.प.क्र.१ यांनी रू.२,१०,५००/– जमा केले तर त्यांना मुक्त करण्याबाबत आदेश केला होता व वि.प.क्र.१ यांनी रक्कम रू.२,१०,५००/– जमा नाही केली तर वि.प.क्र.१ यांना न्यायालयासमक्ष हजर करण्याकरिता आदेशीत केले होते. सदरील आदेशाप्रमाणे आजपर्यंत वि.प.क्र.१ हा तुरूंगामध्ये आहे. वि.प.क्र.१ यांना कारागृहातून आज रोजी हजर करण्यात आले नाही.

**४.** वि.प.क्र.१ यांना परत कारागृहात ठेवण्याकरिता अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वि.प.क्र.१ यांनी थकित असलेली पोटगीची रक्कम जमा न केल्यामुळे परत त्यांना तुरूंगात ठेवण्यात यावे. याऊलट वि.प.क्र.१ ते ४ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वि.प.क्र.१ यांना रक्कम रू.२,१०,५००/– करिता ३० दिवसांची साधी कैद सुनावण्यात आली नव्हती. त्यामुळे परत त्याच रक्कमेकरिता वि.प.क्र.१ यांना कारागृहात ठेवता येणार नाही. त्यामुळे वि.प.क्र.१ यांची कारागृहातून सुटका करावी.

५.		ही बाब मान्य आहे की, वि.प.क्र.१ यांनी रू.२,१०,५००/– एवढी थकित पोटगीची रक्कम जमा केलेली नाही. वि.प.क्र.१ ते ३ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वि.प.क्र.१ हे सदरची रक्कम भरण्यास सक्षम नसल्याने ते रक्कम भरू शकत नाहीत. वि.प.क्र.१ ते ४ यांच्या विधिज्ञांच्या युक्तिवादाप्रमाणे रक्कम रू.२,१०,५००/– करिता वि.प. यांना परत तुरूंगात ठेवता येणार नाही परंतु कलम १२५ उपकलम ३ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, आदेशाच्या प्रत्येक उल्लंघणाकरिता एक महिन्याचा साधा कारावास देण्याची तरतुद आहे. यावरून ही बाब स्पष्ट होते की, प्रत्येक आदेशाच्या उल्लंघनाकरिता एक महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा वि.प. यांना देता येते. अर्जदार यांचे असे कथन नाही की, रू.२,१०,५००/– ही रक्कम एका आदेशाची रक्कम आहे. याशिवाय वि.प.क्र.१ यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी रू.३०००/– अंतरिम पोटगी देण्याचा आदेश माझ्या पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दिलेला आहे. त्यामुळे वि.प.क्र.१ यांनी दरमहा प्रत्येकी रू.३,०००/– अर्जदार क्र. १ ते ३ यांना देणे अपेक्षित होते परंतु वि.प.क्र.१ यांनी सदरची रक्कम अर्जदार यांना दिलेली नाही. त्यामुळे वि.प.क्र.१ यांनी आदेशाचे उल्लंघन केलेले आहे. फौ.प्र.सं. कलम १२५ उपकलम ३ मध्ये स्पष्टपणे नमूद केल्याप्रमाणे वि.प. यांना प्रत्येक आदेशाच्या उल्लंघनाकरिता एक महिन्याची साधी कारावासाची शिक्षा देता येते. त्यामुळे मी वि.प.क्र.१ ते ४ यांच्या विधिज्ञांनी रक्कम रू.२,१०,५००/– करिता परत वि.प.क्र.२ यांना कारागृहात ठेवता येणार नाही या केलेल्या युक्तिवादाशी सहमत नाही.

६.		वि.प.क्र.१ यांनी नि.१२ वरील आदेशाप्रमाणे अर्जदार क्र. १ते ३ यांना प्रत्येकी रू.३,०००/– अर्ज दाखल झालेच्या तारेखपासून म्हणजेच दि.३१/०५/२०२२ पासून अंतरिम पोटगी देणे अपेक्षित होते. अर्जदार व वि.प. यांच्या म्हणण्याप्रमाणे वि.प.क्र.१ यांनी फक्त रू.१०,५००/– जमा केलेले आहेत. सदरचे रू.१०,५००/– ही रक्कम दि.३१/०५/२०२२ ते दि.३०/०६/२०२२

या कालावधीतील समजण्यात आली तर त्याचे नुकसान दोन्ही पक्षकारांना होणार नाही. त्यानंतर नि.७०च्या आदेशाप्रमाणे वि.प.क्र.१ यांना ३० दिवसासाठी तुरूंगात ठेवण्यात आले. सदरचा ३० दिवसांचा कालावधी हा दि.०१/०७/२०२२ ते दि.३०/०७/२०२२ या कालावधीतील समजण्यात यावा. वि.प.क्र.१ हा दि.१३/०३/२०२५ पासून तुरूंगात आहे परंतु त्यांनी पोटगीची थकित रक्कम रू.२,१०,५००/–पैकी काहीही रक्कम भरलेली नाही. आज अखेर पोटगीची रक्कम रु.२,१०,५०० /– वि.प. क्र.१ याने जमा करणे बाकी आहेत. म्हणुन मी त्यास दि.०१/०८/२०२२ ते दि. ३१/०८/२०२२ या कालावधीतील पोटगीची रक्कम न जमा केल्यामुळे वि.प. क्र.१ यास मी दि.११/०४/२०२५ ते दि. ०९/०५/२०२५ या कालावधीकरिता कारागृहामध्ये ठेवण्याचा खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वि.प.क्र.१ यांनी दि.०१/०८/२०२२ ते दि. ३१/०८/२०२२ या कालावधीतील पोटगीची रक्कम न जमा केल्यामुळे त्यास दि.११/०४/२०२५ ते दि.०९/०५/२०२५ या कालावधीपर्यंत कारागृहामध्ये ठेवण्यात यावे.

२. तुरूंगअधिक्षक यांना असे आदेशीत करण्यात येते की, वि.प. क्र.१ याने जर रक्कम रुपये २,१०,५००/– जमा केली तर त्यास ताबोडतोब मुक्त करण्यात यावे.

३. वि.प.क्र.१ यांनी रक्कम रू.२,१०,५००/– जमा नाही केले तर त्यांना दि.०९/०५/२०२५ रोजी न्यायालयासमक्ष हजर करावे.

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2025.04.11 17:23:41 +0530

**दिनांक- ११/०४/२०२५**
**इचलकरंजी.**

**(संजय दि.वानखेडे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,न्यायालय क्रं.३,**
**इचलकरंजी,जि.कोल्हापूर**